**नियमित दि.दावा क्र.१०३/२००८**
**सी.एन.आर.क्र.एमएचएएच२२०००३७७२००८**
जगन्नाथ वि. छबुराव.

**आदेश निशाणी ११८ खालील**
(पारीत दिनांक १०/१२/२०१९)

१) प्रतिवादी क्रं. १ अ ते ई यांनी प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरूध्द झालेला विना केफियत आदेश रद्द होवून दुरूस्ती दाव्यास कैफियत देण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

२) प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दाव्यातील निशाणी ७४ च्या आदेशाप्रमाणे प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. त्याचा निकाल १५/१२/२०१७ रोजी झाला. कोर्टाने दिनांक २५/०६/०१८ रोजी दाव्याचे काम पुढे चालु ठेवण्याबाबत आदेश केला. प्रतिवादींनी दुरूस्त दाव्यास मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते. तथापि, जुन्या दाव्यातील आवश्यक कागदपत्रे न मिळाल्याने कैफियत देता आली नाही. प्रतिवादींस कैफियत देण्याची संधी न दिल्यास त्याचे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्रं. १ अ ते ई यांना दुरूस्ती दाव्याची कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३) वादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे देवुन अर्जातील मजकुर नाकारला. वादीच्या कथनाप्रमाणे निशाणी ७४ वरील आदेशाप्रमाणे ०१/०२/२०१४ रोजी दाव्यात दुरूस्ती करून दुरूस्त प्रत दाखल केली आहे. त्यानंतर ९० दिवसात कैफियत दाखल करणे आवश्यक होते. तथापि, प्रतिवादींनी कैफियत तब्बल पाच वर्षांनी दाखल केली आहे. दावा सन २००८ पासून चालु असुन निशाणी ५ चा निकाल झाला आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली.

४) प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.बी.सी.शेळके व वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे.वाकडे यांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रस्तुत दाव्यातील वादीने निशाणी ७४ वर दावा दुरूस्तीसाठी अर्ज केला. त्याविरूध्द प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. त्याचा निकाल दिनांक १५/१२/२०१७ रोजी झाला. दिनांक २६/०६/२०१८ रोजी दाव्याचे कामकाज पुढे चालु झाले. त्यामुळे प्रतिवादींना दाव्यास कैफियत देता आली नाही. जुन्या दाव्यातील आवश्यक कागदपत्रे न मिळाल्याने कैफियत देण्यास विलंब झाला. सबब, प्रतिवादींना दुरूस्त दाव्यास कैफियत देण्याबाबत परवानगी दयावी असे कथन केले आहे. वादींनी आदेशानंतर ३१/०१/२०१४ रोजी दावा दुरूस्त केला आहे. तर दुरूस्त दाव्याची प्रत दिनांक ०१/०२/२०१४ रोजी दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केली. प्रत प्रतिवादींनी त्या दिवशी स्विकारली नाही.

६) प्रस्तुत अर्ज प्रतिवादीचे वारस १अ ते १ई यांनी दाखल केला असून प्रतिवादी क्रं. १ चे वारस निशाणी ८८, ८९ व ९० वरील आदेशाप्रमाणे दिनांक ०८/०२/२०१९ रोजी रेकॉर्डवर घेतले आहे. प्रतिवादी क्रं. १अ ते १ई वकिलांमार्फत दिनांक २१/१२/२०१८ रोजी हजर झाले आहेत. दिनांक ०८/०२/२०१९ रोजी दाव्यात दुरूस्ती करून त्यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट केले. तथापि, त्यांनी त्यानंतर दाव्यास कैफियत दिली नाही. कैफियत देण्यास तब्बल आठ महिन्यांचा विलंब लावला आहे. दावा अकरा वर्षे जुना आहे. त्यामुळे दावा तात्काळ सुनावणीसाठी घेतला आहे. वादीने त्याचा व साक्षीदाराचा पुरावा देवुन पुरावा बंद केल्यावर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींच्या या वागण्यामुळे वादीस न्यायास विलंब होत आहे. तथापि, दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. प्रतिवादींनी केलेल्या विलंबाबाबत वादीस नुकसान भरपाई देता येईल. तथापि, अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींचे नैसर्गिक हक्कावर गदा येणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **: आदेश :**

१) प्रतिवादी क्रं.१अ ते १ई यांनी वादींना रक्कम रूपये ३०००/- (अक्षरी तीन हजार रूपये मात्र) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर केला.

२) प्रतिवादी क्रं. १अ ते १ई यांनी पुढील तारखेपूर्वी खर्चाची रक्कम देवुन पुर्तता करावी व तशी पुर्तता न केल्यास सदर आदेश रद्दबातल होईल याची नोंद घ्यावी.

(३) प्रतिवादींनी पुर्तता केल्यावर त्यांची कैफियत स्विकारण्यात यावी.

सही/-

दिनांक : १०/१२/२०१९ (ध.ज. पाटील)
कर्जत. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.